International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.4 Mar – Apr 2022

# गौरी देशपांडे यांच्या तात्विक अभिव्यक्ती आणि स्त्रीवादी विचारसरणीचे विश्लेषण

**सौ. मनिषा विद्यानंद शिंदे**
*पी.एचडी. रिसर्च स्कॉलर,*
*मराठी विभाग,*
*श्री जे जे टी विश्वविद्यालय, राजस्थान*

**डॉ.प्रतिभा शंकर घाग**
*प्राध्यापक,*
*श्री जे जे टी विश्वविद्यालय, राजस्थान*

**गोषवारा:**

हा पेपर गौरी देशपांडे यांच्या तात्विक अभिव्यक्ती आणि स्त्रीवादी विचारसरणी यावर आधारित आहे. गौरी देशपांडे यांच्या लेखनात त्यांच्या मुक्त विचारांचं प्रतिबिंब अगदी स्पष्ट दिसतं. त्यांचं लेखन स्त्रीवादी असण्यापलीकडे जाऊन स्वातंत्र्यवादी, व्यक्तिवादी होतं. वेगवेगळ्या पातळीवरचं प्रेम, त्या प्रेमाची मोजावी लागणारी किंमत आणि त्या प्रेमाच्या मर्यादा ह्याबद्दलचे विचार तिच्या लेखनात दिसतात. स्त्रीवादाच्या वाटेवरून जाणाऱ्या कोणत्याही आधुनिक, मराठी साहित्यप्रेमी माणसाला गौरी देशपांडे हे नाव टाळून पुढे जाता येत नाही. तो एक अपरिहार्य टप्पा असतो, असंच तिचं लेखनकर्तृत्व आहे. गौरी देशपांडे यांनी स्त्रीवादी विचारसरणीचे लेखन करून कादंबरीला आशयघनता प्राप्त करुन दिली. त्यांनी नायिकप्रधान कादंबऱ्यांची निर्मिती केली. त्यांच्या कादंबरीतले जग हे उच्चमध्यमवर्गीय आहे आणि ते जग विचारशील पद्धतीने मांडले गेले आहे. त्यांचा पहिला कथासंग्रह आहे हे असं आहे १९६८ साली प्रसिद्ध झाला आणि सतत १९६८ ते २००२ या काळात त्यांच साहित्य प्रसिद्ध झालं. १९६० नंतर मराठी साहित्य क्षेत्रात विविध वाङ्मय प्रवाह उदयास आले. ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी साहित्य हे भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य विचारप्रणाली यांच्या विचारसरणीतून निर्माण झाले आहे.| पाश्चिमात्य स्त्रीयांनी आपल्या हक्कासाठी लढे उभा केले. पुरुषांचे वर्चस्व दाखवून दिले. स्त्रीही माणूस| आहे तीला मानव्यता मिळविण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. भारतातही महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई शिंदे, राजाराम मोहनरॉय, लोकहितवादी, रानडे, आगरकर, कर्वे यांनीही स्त्री सुधारणेसाठी मौलीक योगदान दिले. स्त्रीयांना समानतेची वागणूक मिळावी त्यांच्या हक्काची त्यांना जाणवी करून दिली. त्यांचे एकूणच जीवन सुधारण्यासाठी स्वतःचे आयुष्य पणाला लावले. आजही स्त्रीस्वातंत्र्यासाठी हक्कासाठी स्त्रीयाचा संघर्ष, त्यांचा लढा चालूच आहे.

**परिचय:**

गौरी देशपांडे या मराठीतील लेखिका होत्या. कथा, कादंबरी, ललित लेख, स्फुट लेखन, ललितेतर लेखन, भाषांतर, कविता, संशोधन यासारखे बहुतांशी सगळे साहित्यप्रकार देशपांडे यांनी हाताळले. मराठीबरोबरच त्यांचे बरेचसे इंग्रजी लिखाण तसेच काही इंग्रजी -मराठी व मराठी- इंग्रजी अनुवादसुद्धा प्रकाशित झाले. देशपांडेंच्या आई लेखिका, संशोधक इरावती कर्वे होत्या. दिनकर धोंडो ऊर्फ डी. डी. कर्वे हे त्यांचे वडील होते. जाई निंबकर या इंग्रजी व मराठीतील लेखिका त्यांच्या थोरल्या भगिनी. समाजसुधारक व स्त्री-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे हे डी. डी. कर्वे यांचे वडील व देशपांडे यांचे आजोबा होते. 'समाजस्वास्थ्य' या स्वातंत्र्यपूर्व काळातील मासिकाचे संपादक र. धों. कर्वे हे देशपांडेंचे यांचे काका होते.

स्त्रीवादाच्या वाटेवरून जाणाऱ्या कोणत्याही आधुनिक, मराठी साहित्यप्रेमी माणसाला गौरी देशपांडे हे नाव टाळून पुढे जाता येत नाही. तो एक अपरिहार्य टप्पा असतो, असंच तिचं लेखनकर्तृत्व आहे.कादंबरी, कथा, भाषांतरं, कविता, ललितलेखन अशा अनेक माध्यमांतून केलेला मुक्तसंचार, रचनेचे अनोखे प्रयोग; विलक्षण मोहक भाषा; आणि लेखणीचा 'धीट'पणा अशा अनेक रास्त कारणांमुळे तर ती गाजलीच. दुसरीकडे तिच्या सुधारकी कुटुंबाचा वारसा, तिचे ढगळ कुडते आणि आखूड केस, बिनधास्त वावर आणि तिची सर्वसाधारण मराठी बायकांपेक्षा थोडी जास्त असलेली उंची अशा अनेक साहित्यबाह्य कारणांमुळेहीमराठीजनांना ती ठाऊक असते.

स्त्रीवादी साहित्यविचाराच्या प्रसाराबरोबरच स्त्रीवाद हा मुक्तीच्या संकल्पनेवर आधारलेला असल्याने त्यात बेबंद स्वातंत्र्य येणारच असे माननारा वर्ग आजही आहे. गौरी देशपांडे यांच्या कथावाङ्ग्यात मात्र स्वातंत्र्य आणि जबाबदा-या यांचा समतोल राखणारी पात्रे रंगवली गेली आहेत. गौरी देशपांडे जेव्हा लिहू लागल्या तेव्हा स्त्रीवादी विचार जगभर पसरू लागला होता. परिणामस्वरूप गौरी देशपांडेंच्या लेखनात स्त्रीवादी जाणीव अधिक स्पष्टपणे आलेली दिसून येते.

**गौरी देशपांडे यांची ग्रंथसंपदा:**

गौरी देशपांडे यानी नायिका प्रधान कथा, कादंबऱ्याची निर्मिती केली. या कथा आणि कादंबरी मधील जग उच्चमध्यमवर्गीय आहे. हे वैचारिक जग मांडले आहे हे अस आहे. हया कथा संग्रहातील कथा अनेक नियतिकालिकांमधून १९७० ते १९८० या काळात प्रसिध्द झालेल्या आहेत. एकेक पान गळावया हे

पुस्तक मौज प्रकाशनाने १९८० मध्ये प्रकाशित केले. यात तीन लघुकादंबऱ्या समावेश आहे. त्यानंतर तेरूओ आणि काही दुरपर्यंत निरगाठी आणि चंद्रिके गं सारिकं गं, दुस्तरहा घाट आणि यांग, मुक्काम गोफ उत्खनन. विचुर्णीचे घडे हे ललित गद्य एवढं साहित्य त्यांच्या नावावर आहे.

**गौरी देशपांडे यांच्या स्त्रीवादी साहित्य विचारसरणीचे विश्लेषण**:

स्त्रियांचे माणुसपणाचे हक्क संपवीणारी संस्था म्हणजे विवाहसंस्था या विवाहसंस्थेविषयीचे अनेक प्रश्न त्यांच्या साहित्यात निर्माण होतात. एकंदरीत स्त्री स्वातंत्र्याच्या प्रखर पुरस्कर्त्या म्हणून गौरी देशपांडे आणि त्यांच्या साहित्याकडे बघता येते. मांडवलशाही व्यवस्थेत बदलते नातेसंबंध त्याचा स्त्रीयाच्या मनोधारणेवर झालेला परिणाम यांचे प्रभावी चित्रण गौरी देशपांडे करतात. अधुनिक स्त्रीयांची घुसमट आणि या घुसमटीतून बाहेर येऊन माणूस म्हणून जगण्यासाठी केलेली धडपड यांचे चित्रण करतात. स्त्रीचे म्हणून मानवीकरण करण्याची प्रक्रीया गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतून सहजपणे अभिव्यक्त होते. आयुष्याशी प्रमाणीक असलेल्या आणि स्त्री म्हणून जगताना मनात येणारी प्रत्येक मानसीक, शारीरिक भावना स्पष्टपणे मांडणाऱ्या नाईका गौरी देशपांडे यांनी पुढे आणल्या गौरी देशपांडे ज्या वातावरणात राहिल्या त्या वातावरणातील प्रतिमा त्यांनी रंगविल्या. स्त्रीयामधील माणूसपणाचे मान जागृत करणारे आहेत. स्त्री आणि पुरुष दोघाच्याही सगळयाच भावानेने न पाहता निखळ मानवी देह पाहण्याचा आग्रह धरतात. स्त्रीच्या देहाभोवती नीतीकतेचे निकष तोडायला सुरूवात केली. स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. पण हा पुरस्कार करताना त्यांच्या नायिका कधीही उथळ, चंचल वाटत नाही. स्त्री या स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या, जबाबदारीची जाणीव असलेल्या वर्णन करतात. त्यांच्या स्त्रीया निरपेक्ष आणि निकोप जीवन पदतीच्या शोधात आहेत असे वाटते. उत्खनन कांदबरी मध्ये प्रामुख्याने स्त्री पुरूष संबंधावर भर आहे. स्त्री म्हणून जगाशी येणारे संबंधाशी वर्णन आहे. गौरी देशपांडे यांचे साहित्य १९७० ते २००२ या काळात प्रसिध्द झाले आहे. भारतीय स्त्री जीवनात झालेली स्थित्यंतरे त्यांनी अत्यंत घिटपणे आपल्या कांदबऱ्यामधून मांडली. या ६० वर्षात भारतीय पारंपरिक मुल्याची झालेली पडझड, भांडवलशाही जागतीकीकरण या सर्वाचा परिणाम भारतीय स्त्री जीवनावर कसा झाला याचा आढावा गौरी देशपांडे यांनी आपल्या लघु कांदबऱ्यामध्ये घेतला आहे. एकंदरीत १९७० ते २००२ हा काळ नव अधुनिक जाणीवांचा काळ आहे.

**साहित्य पुनरावलोकन:**

**डॉ. श्वेता सिंह, "गौरी देशपांडे यांच्या कवितांमधील आंतर-वैयक्तिक संबंधांचाअभ्यास"**

कवयित्री म्हणून गौरी देशपांडेही त्याला अपवाद नाहीत. अभ्यासानुसार आम्हाला आढळले आहे स्त्रीवादी कवयित्रींनी लिहिलेल्या कविता बहुतेक स्वरात आणि कबुलीजबाबदार असतात.त्यांनी त्यांचे स्वानुभव ओतले.आणि आमच्या पुरुषांचे वर्चस्व असलेले पैलू पाहिले.समाज कवयित्री म्हणून गौरी देशपांडेही आपले वैयक्तिक विचार मांडतात आणि स्त्रीच्या स्वतःच्या जीवनातील जीवन आणि नातेसंबंधांच्या स्थितीबद्दल अभिव्यक्ती तिच्या डोमेनमधील इतरांच्या जीवनाप्रमाणे. गौरी देशपांडे परस्परांच्या शोधात अतिसंवेदनशील आहेत. नाते; प्रेम आणि लैंगिक विषय तिच्या हातात शस्त्रे बनतात आणि ती अद्भुत मार्गांनी स्त्रीत्वाच्या अभिव्यक्तीसाठी त्यांचा नाटकीयपणे वापर करते. तिची चंचलपणाची भावना तिला जिव्हाळ्याच्या उंबरठ्यावर ढकलते.

**मिस रुमी कामन, (2019)," स्त्रीवाद आणि आधुनिक समाजातील स्त्रियांवर त्याचा प्रभाव"**

स्त्रीवाद ही सामाजिक चळवळी, राजकीय चळवळी आणि विचारसरणीची एक श्रेणी आहे जी एक समान ध्येय सामायिक करते; स्त्री-पुरुषांच्या राजकीय, आर्थिक, वैयक्तिक आणि सामाजिक समानतेची व्याख्या, प्रस्थापित आणि साध्य करण्यासाठी स्त्रीवाद हे स्थान समाविष्ट करतो की समाज पुरुष दृष्टिकोनाला प्राधान्य देतात आणि त्या समाजांमध्ये स्त्रीला अन्यायकारक वागणूक दिली जाते समाजातील एक महत्त्वाची सदस्य होण्यासाठी स्त्रीने अनेक समस्या, अडथळे आणि अडथळे पार केले. भूतकाळात स्त्रीला कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते, पुरुषाकडून तिला अलिप्त, दुर्लक्षित आणि वाईट वागणूक दिली जात होती. स्त्रीवादाच्या आगमनाने स्त्रीची व्यक्तिरेखा आणि प्रतिमा पूर्णपणे बदलून पुरुषाच्या हातातील पोपट बनली आहे. ती राणी, राष्ट्रपती, कलाकार आणि शिक्षिका बनते.

**संशोधन पद्धती:**

शाब्दिक, टीकात्मक, मूल्यमापनात्मक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि व्याख्यात्मक पद्धती वापरून, प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांद्वारे नुकसानीचा वारसा वापरून, गौरी देशपांडे यांच्या तात्विक अभिव्यक्ती आणि स्त्रीवादी विचारसरणीचे विश्लेषण अभ्यासावरही हा अभ्यास केंद्रित आहे.

संशोधन अभ्यासासाठी डेटा संकलन, प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांकडून डेटा गोळा केला जातो, ज्याचे विश्लेषण केले जाईल.

गौरी देशपांडे यांनी लिहिलेल्या मूळ ग्रंथातून प्राथमिक स्रोत गोळा केला जाईल

दुय्यम स्रोत दुय्यम स्रोत हा एक स्रोत आहे जो प्रस्तावित अभ्यास यशस्वी करण्यासाठी प्रदान करतो, वर्णनात्मक, मूल्यमापनात्मक तसेच तुलनात्मक पद्धती वापरल्या जातील आणि अभ्यासाच्या आवश्यकतेनुसार गंभीरपणे विश्लेषण केले गेले आहे अभ्यासामध्ये मुख्यतः दुय्यम स्रोतांकडून समाविष्ट असलेल्या समस्यांवरील विद्यमान डेटा वापरण्याची योजना आहे. पुस्तके, विकिपीडिया, एनसायक्लोपीडिया जर्नल, इंटरनेट इत्यादी दुय्यम स्रोतांकडून डेटा प्राप्त केल्यानंतर मुद्द्यांवर गंभीर विश्लेषण केले आहे.

**निष्कर्ष:**

गौरी देशपांडे या लेखिकेच्या तात्विक अभिव्यक्ती आणि स्त्रीवादी विचारसरणी त्याबरोबरच गौरी देशपांडे यांच्या कादंबरी निर्मितीचा स्थूल आढावाही घेतला आहे. या प्रकरणात गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील साहित्य विचारसरणीचे विश्लेषण मनोभूमिकांचा विचार मांडलेला आहे. 'एकेक पान गळावया', 'दुस्तरहा घाट', 'मुक्काम', 'निरगाडी', 'मध्यलटपटीत', 'आहे हे असे आहे', 'चंद्रिके ग सारिके गं' इ. कादंबरी लेखनाच्या अनुषंगाने आणि आधाराने प्रेरणा हेतु अनु अभिव्यक्ती याविषयी विचार मांडले आहेत. विशेषत: गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रीव्यक्तिरेखा, त्यांचा संघर्ष, त्यांचा जीवनाकडे व विशिष्ट घटनाप्रसंगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन याविषयी सोदाहरण स्पष्टीकरण मांडण्यात आलेले आहे.

**संदर्भ:**


1. जर्नल, एम. एस. (२०२०). गौरी देशपांडे डॉ. श्वेता सिंग यांच्या कवितांमधील परस्पर संबंधांचा अभ्यास.
2. घोरफती, ए., आणि राभा, एम. (२०१५). स्त्रीवाद आणि आधुनिक समाजातील स्त्रीवर त्याचा प्रभाव. अल्जेरिया प्रजासत्ताक, ६-५९.